अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र



वर्ष ४७ वे
अंक ११ वा
१० डिसेंबर २०२५
किंमत १ रुपया

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## ९२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

दि.१०/१२/२०२५

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी श्री परशुराम भवन, सी.बी.एस., नाशिक येथे सकाळी १०.३० वा. आयोजित करण्यात आली आहे.

### * सभेपुढील येणारे विषय *

१) दिनांक २६/०१/२०२५ झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२५ या सालच्या अहवालास मंजूरी देणे

३) सन २०२४-२५ या सालच्या आर्थिक पत्रके, आढावा पत्रके व ऑडीट रिपोर्टची नोंद घेणे.

४) सन २०२६-२७ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

५) सन २०२६-२७ या सालासाठी लेखापालाची नियुक्ती करणे.

६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर विचार करणे.

श्री.नितीन सहस्त्रबुद्धे
कार्यवाह

### * सूचना :-

१) काही प्रश्न, काही सूचना असल्यास दि.२०/०१/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात संघाच्या कार्यालयात (श्री परशुराम भवन, सी.बी.एस., नाशिक) आणून द्याव्यात.

२) मुदतीनंतर किंवा आयत्यावेळी आलेल्या सूचनांचा विचार होणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

३) गणसंख्येअभावी सभा स्थगित करावी लागल्यास, ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरु होईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

४) हिशोब पत्रके कार्यालयात ठेवलेली आहे.





चित्तपावन उद्योजक मंचच्या तिसरी सभा उत्साहात

सामुदायिक बोडण आनंदी व उत्साही वातावरणात संपन्न

















स्नेहबंध वर्धापन दिनाचे क्षणचित्रे

# स्नेहबंध मैत्रिणींचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात आपण 'स्नेहबंध'चा वर्धापन दिन साजरा करतो. यावर्षी २१ नोव्हेंबर शुक्रवार, या दिवशी '१३ वा वर्धापन दिन' साजरा करण्यात आला.

म्हणता म्हणता, 'स्नेहबंध मैत्रिणींचा' हे चित्तपावन महिला मंडळ सुरू होऊन १३ वर्षे झाली. वर्षभर आपण प्रत्येक महिन्याच्या ४ थ्या शनिवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करतो, यात पारंपरिक सण समारंभ तर आपण साजरे करतोच, त्याशिवाय विविध विषयांवरती कार्यक्रम घेत असतो. त्याचाच एक भाग म्हणून हा साजरा होणारा 'वर्धापन दिन'' यासाठी 'प्रमुख अतिथी' म्हणून नाशिकच्याच प्रसिद्ध नृत्यांगना. गेली ४० वर्षे 'कथक' नृत्यात आपली कारकिर्द घडविणाऱ्या श्रीमती रेखाताई नाडगौडा यांना आमंत्रित केले होते. तर सामाजिक बांधिलकी जपत एखादे विशेष कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थेचाही आपण गौरव करतो.

यावर्षीच्या प्रमुख सत्कारार्थी होत्या, ''रुपालीताई जोशी'', सोडून दिलेल्या बेवारस प्राण्यांचे व भाकड गाईंचे संरक्षण व पालन पोषण, आजारी गाईंची सेवा, सुश्रुषा करण्याचे काम करणाऱ्या रुपालीताई ''मंगलरूप गोशाला'' चालवितात. तेथे गाईंचे, गोवंशाचे संवर्धन, जतन करण्याचे खाटीकखान्यापासून गाईंना वाचविण्याचे मोठे काम करतात. गेल्या २९ वर्षे त्या हे पुण्यकर्म करीत आहेत.


रेखाताई नाडगौडा यांची प्रगट मुलाखत मैथिली गोखले यांनी विविध प्रश्न विचारून त्यांच्या कार्याचा परिचय सर्व मैत्रिणींना करून दिला. मुलाखत अधिकाधिक रंगत गेली. तर रुपालीताई जोशी यांच्या भाषणात त्यांनी गाई, घोडे यासारखे मुके प्राणी, आजारी वृद्ध, अपंग प्राणी सांभाळतांना त्यांना आलेले अनुभव अंगावर शहारे आणणारे होते. प्रसंगी जीवावर बेतलेले प्रसंग, पोलीस शासकिय यंत्रणा यांचे आलेले अनुभव त्यांनी कथन केले. त्यांची ही निःस्पृह सेवा व प्राणी प्रेम, त्यासाठी आयुष्य पणाला लावलेले, ऐकून सगळ्या मैत्रिणी भारावून गेल्या.

या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाचा २०२१-२२ चा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, जिल्हास्तरीय पुरस्कार राष्ट्रसेविका समितीचे कार्य करणाऱ्या विद्याताई चिपळूणकर यांना जाहीर झाला. चित्तपावन संघानेही त्यांचा शाल, श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन चित्तपावन संघाचे अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर दुसरा सत्कार सोनाली करंदीकर यांचाही अध्यक्ष विजयजी साने यांच्या हस्ते झालं. श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सोनालीताई गेली २३ वर्षे नाशिकमध्ये 'भारत नाट्यम्' शिकवतात. त्यांनी विविध विषयांवर ''संरचना'' 'नृत्याद्वारे सादर केल्या आहेत. २०१९ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधीत्व करत Worldcup of Folkore मध्ये २२ देशांतून प्रथम क्रमांक मिळवत त्यांच्या विद्यार्थीनींनी ''वर्ल्डकप जिंकला. याशिवाय असे अनेक मानाचे पुरस्कार त्यांनी जिंकले आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली. अध्यक्ष विजय साने यांनी चित्तपावन ब्राह्मण संघाच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. मंडळाच्या महिला अध्यक्षा सौ. मंगला जोगळेकर यांनी 'स्नेहबंध'च्या वार्षिक कार्यक्रमाचा आढावा घेतला.

सौ. माधवी जोगळेकर यांनी रेखाताई नाडगौडा यांचा तर सौ. सुनिता परांजपे यांनी रुपालीताई जोशी यांचा थोडक्यात परिचय करून दिला, सौ. जान्हवी नातू यांनी सूत्र संचालन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख रेखाताई नाडगौडा यांचाही शाल, श्रीफळ व परशुरामाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला, तर रुपालीताई जोशी यांचाही शाल, श्रीफळ व श्री परशुराम प्रतिमा देऊन सत्कार तसेच सामाजिक बांधिलकी जपत संस्थेतर्फे त्यांच्या कार्याला रु. ११०००/- ची आर्थिक मदत देण्यात आली.

सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या समारोपापूर्वी 'स्नेहबंधची एक मैत्रिण कै.सौ. रेखाताई फडके यांची आठवण जागवत त्यांनाही ऋणनिर्देश 'स्नेहबंध' तर्फे करण्यात आला. कार्यक्रमासाठी ९० मैत्रिणी उपस्थित होत्या. पावभाजी व गुलाबजामचा आस्वाद घेत कार्यक्रमाची सांगता झाली.



# चित्तपावन उद्योजक मंचच्या तिसऱ्या सभेचा वृत्तांत.




चित्तपावन उद्योजक मंचचा या वर्षीचा तिसरा कार्यक्रम दि.१८ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमातील प्रमुख वक्ते होते ग्रुप कॅप्टन श्री. विनायक देवधर.

देवधर सरांना सैन्य दलातील सेवेचा प्रदीर्घ अनुभव आहे. कार्यक्रमाच्या संबोधनात देवधर सरांनी 'कारगिल वॉर' मधील अनेक रोचक बाबींची माहिती दिली. सैन्य दलासाठी आव्हानात्मक असलेल्या कारगिल मधील खडतर भौगोलिक परिस्थितीवर मात करत भारतीय पायदळ आणि हवाईदळ यांनी कसा विजय मिळवला याची घटनावार कथा देवधर सरांनी उलगडली.

भारतीय लष्कर वापरत असलेली निरनिराळी विमाने, क्षेपणास्त्र तसेच बॉम्ब विषयी माहिती देखील सर्व श्रोत्यांचे लक्ष खिळवून ठेवणारी होती. सैन्य दलाला लागणारे विविध पार्ट्स मिळवताना टेंडरिंग प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि ' खाकी दिमाग ' कसे विचार करतात आणि त्यामुळे कशा गमती घडू शकतात याची माहिती देखील मनोरंजक होती. प्रमुख वक्त्यांचे भाषण संपल्यानंतर उद्योजक मंचच्या आदल्या दिवशी हजर राहिलेल्या नवीन सभासदांनी त्यांचा स्वतःचा, तसेच ते करत असलेल्या व्यवसायाचा परिचय करून दिला. उद्योजक मंचच्या या उपक्रमामुळे जुन्या व नवीन पिढीतील अनेक उद्योजक एकत्र येत आहेत ही गोष्ट खचितच उत्साहवर्धक आहे. कार्यकमाचे प्रमुख वक्ते, श्री. देवधर सर, संध्याकाळी सर्वांच्या आधी कार्यक्रमाच्या ठिकाणी हजर होते. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन प्रत्येक सभासदाने दर कार्यक्रमाला पाच मिनिटे आधी पोहोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी मोलाची सूचना श्री. देवेंद्र बापट सरांनी केली. या कार्यक्रमासाठी उद्योजक मंचचे तरुण सभासद श्री. मंदार गोखले आणि श्री. प्रणव काळे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्या दोघांचेही मनापासून अभिनंदन.

**– आर्किटेक्ट दीप भागवत**



**पराग वैशंपायन**
फोटोग्राफर
**क्षणांचे सौंदर्य कॅमेऱ्यातून टिपतो..**
**आनंदी क्षणांच्या आठवणी आपुलकीने जपतो..**

* साखरपुडा फोटोग्राफी/व्हिडिओ
* प्रिवेडिंग फोटोशूट/व्हिडिओ
* ट्रेडिशनल वेडिंग फोटोग्राफी
* वेडिंग कँडिड फोटोग्राफी
* वेडिंग ट्रेडिशनल व्हिडिओ
* सिनेमॅटिक वेडिंग व्हिडिओ
* बेबीशॉवर शूट

आधुनिक उपकरणांसह तरबेज टीम
ऑफीस : प्रभूशिल्प अपार्टमेंट, तपोवन रोड, नाशिक
9225762400 / 9405360834

# सामुदायिक बोडण उत्साहात संपन्न

'बोडण' हा कोकणस्थ ब्राह्मणांचा एक महत्त्वाचा कुळाचार आहे. पण सध्या जागेची समस्या, स्त्रियांची नोकरी, इतर अनेक वाढलेल्या जबाबदाऱ्या! त्यामुळे अनेकजणांना 'बोडणे' करायला जमत नाही. पण... कुळधर्म करण्याची इच्छा तर असते.

म्हणून चित्तपावन ब्राह्मणसंघ, नाशिकच्या कार्यकारिणीने बोडण सामुदायिक पद्धतीने करण्याचे ठरविले. स्नेहबंध मैत्रिणींचा ह्या मंडळाच्या अनेक मैत्रिणींनी हे महत्त्वाचे धार्मिक कार्याची जबाबदारी घेतली..

त्यानुसार यजमानांना सूचना, खर्चाचा आढावा, देणगीची रक्कम, वस्तूंची यादी इत्यादी अनेक गोष्टींची तयारी गेल्या १५ दिवसांपासून चालू होती.

उत्तम नियोजन, उत्कृष्ट संघकार्य (Team-work) रुचकर पारंपरिक भोजन (प्रसाद) व श्री योगेश्वरीचा आशीर्वाद ह्यामुळे बोडण विधी उत्तम पद्धतीने, वेळेत पार पडला.

अर्थातच चित्तपावन ब्राह्मणसंघ, नाशिकचे सर्व पदाधिकारी ऑफिस स्टाफ यांचे नेहमीप्रमाणे चांगले सहकार्य होते. यावर्षी प्रथमच बोडण–धार्मिक विधीचा उपक्रम घेण्यात आला. ११ बोडणे संपन्न झाली.

## सामुदायिक बोडण कार्यक्रमानिमित्त मिळालेले अभिप्राय :–

१) सौ. सई प्रथमेश फाटक –
अभिप्राय : अत्यंत सुंदर तयारी. सामुहिक बोडण भरताना कुटुंब मोठे झाल्यासारखे वाटले. खूपच सुंदर उपक्रम.

२) सौ.विशाखा दाते –
सुंदर तयारी. मी नोकरी करत असल्याने खूपच सोईच झालं. अत्यंत आभारी आहे.

३) सौ. गायत्री गिरीश गोखले – ९४२२२७३५५९.
अभिप्राय : अतिशय सुंदर. किती बारीक तयारी अतिशय आठवणीने व्यवस्थित केली होती. महिला कार्यकारिणीचे मनापासून कौतुक. खूप – खूप छान. कौतुकास्पद कार्यक्रम.

४) श्रीमती निशा फाटक – ९९६०१७७६२६
पुढच्या बोडणाला मदतीला यायला आवडेल.

५) 'सामुहीक बोडण' हा चित्तपावन तर्फे आयोजीत केलेला स्तुत्य उपक्रम आहे. नाशिक, पुणे व औरंगाबाद येथे एकाच वेळी आयोजीत केलेला होता.
खूप सुंदर नियोजन, सुस्पष्ट सूचना व मार्गदर्शन व महत्त्वाचे म्हणजे बोडणाची सर्व मुख्य तयारी व साहित्य, संतवाणी आणि कुमारीकांचे बोलवणे इ. संघातर्फे होते. सर्व महिला मदतनीस यांचे आभार.

६) सौ. प्रिया जोशी
अभिप्राय : बोडण हा उपक्रम खूपच छान वाटला. सुरुवातीला सामुहीक म्हटल्यावर शंका होती की, सगळ्यांच्या मध्ये कसे होईल. ह्याची पण खूपच छान झालं बोडण. समाधान वाटलं. सर्व मदतनीसांचे आभार.

७) सौ. अनघा विकास जोशी
अभिप्राय :– आज अत्यंत सुंदर पद्धतीने बोडण संपन्न झाले. आज बोडण भरल्यानंतर समाधान झाले, अत्यंत सुंदर नियोजन. छान तयारी. त्यामुळे आनंद झाला. सर्व कार्यकारिणी सदस्यांचे धन्यवाद, कोणत्याच गोष्टींची उणीव जाणवली नाही. परत एकदा धन्यवाद!

८) योगिता दातार –
बोडण ग्रुप कार्यकारिणी– खूप सुंदर नियोजन आणि तयारी. काहीच कमी नव्हते.बोडण भरल्याचे समाधान मिळाले. बोडण भरल्याचे समाधान मिळाले. तुम्हा सगळ्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच. सगळ्यांना मन:पूर्वक धन्यवाद!

९) आसावरी अभ्यंकर –
आयोजन नियोजन चित्तपावनी पद्धतीने खूप छान, सगळ्या कार्यकारिणीची मेहनत फळाला आली, खुप शुभेच्छा!

१०) छान उपक्रम आहे. तो उत्तमरीत्या, सुविहित पार पडला. आनंद वाटला. भोजनाची व्यवस्था छान होती. पुढच्या कार्यक्रमांना खूप शुभेच्छा!

११) शलाका रानडे –
खूपच मस्त आयोजन आणि नियोजन. जेवणाची सोय पण खूपच मस्त. तुम्ही सगळ्यांचे अभिनंदन!

१२) सौ. सुवर्णा दावल –
किती टक्के मार्क? असा प्रश्न विचारल्यास सामुदायिक बोडण. या उपक्रमाला १०१%. अप्रतिम नियोजन. इतकं बारीक नियोजन बघून सर्व टीमचं कौतुक आणि अभिनंदन!!!

घरी एकच बोडण भरतांना घरच्या बाईची होणारी धांदल आमच्या वतीने तुम्ही सर्वांनी केली. त्यामुळे सर्वजणींचे धन्यवाद! काहीच कमी झाले असे जाणवलेही नाही. बोडण करून पूर्ण समाधान मिळाले.

१३) सौ. वैदेही विवेक केळकर –

अतिशय उत्तम नियोजन, बारीक सारीक सर्व तयारी खूप छान केली होती. सर्व कार्यकारी सदस्या अतिशय उत्साहाने सर्व करत होत्या. खूप समाधान वाटले. हा उपक्रम सुरू केल्याबद्दल अगदी मनापासून धन्यवाद! बोडण भरण्याचा कार्यक्रम जर आपल्या ग्रुपवर कळवला तर जे प्रथमच करत आहेत. त्यांना सोयीचे होईल. सहज सुचले. पुन्हा एकदा धन्यवाद!

१४) वैजयंती भागवत (मुंगसे) –

खूपच सुंदर. माझे पहिलेच बोडण भरणे असूनही मला वाटणारी भिती पळून गेली व खूप छान झाले.

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## इमारत निधी नोव्हेंबर २०२५ - देणगीदार

**कै. र. के. पटवर्धन स्मृती श्री परशुराम भवन प्रकल्पासाठी नोव्हेंबर २०२५ मध्ये जमा झालेल्या देणग्या**

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री.राजन भालचंद्र दातार | १५,०००००/- |

## इतर देणगीदार - नोव्हेंबर २०२५

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्री.अरविंद कमलाकर ओक | ५,०००/- |
| ०२ | श्री.शेखर परांजपे | ५०१/- |

ATT
ATT OVERSEAS
Education Advisors

ATT OVERSEAS
Education Advisors

Training for
IELTS | SAT | PTE | GRE

Assistance in
University & Program Selection | Admission Process | Visa & Interview

USP
- Limited batch size
- Flexible timings
- Interactive learning environment
- Personal attention



Director
Yasmin Dandekar
70302 36222
attnsk20@gmail.com

4, Alap Apartments, above Chai Ketli Cafe, D'Souza Colony, off College Road, Nashik

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमारी गीता भास्कर रानडे**<br>रानडे वाडा, रविवार पेठ, नाशिक<br>मोबा.: ९१७२९९३७७८ | १७/०७/१९९५ | भारद्वाज | ५'.२'' | MBA | ३०,०००/– |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमार श्रेयस मंगेश जोशी**<br>सद्गुरु बंगला, जनरल वैद्य नगर, पौर्णिमा स्टॉप,<br>मो.: ९८९०१८४९३१ | २९/०८/१९९७ | शांडील्य | ५'.९'' | MS. डाटा सायन्स | ४०,०००/– |
| **कुमार देवधर शिरीष कांत**<br>फ्लॅट नं.३, मधुरा हौ.सोसा.संभाजी चौक, नाशिक<br>मोबा.: ९९८७६७०५९३ | ०८/०६/१९७९ | कौशिक | ५'.४'' | एम.टेक लीड इंजि. | – |



### भावपूर्ण श्रद्धांजली...

– आपल्या संस्थेचे सभासद श्री. उल्हास बागुल ( श्रीरामपूर) यांच्या पत्नी सौ.उत्तरा बागुल (मंजुषा वैशंपायन) यांचे वयाच्या ५४ व्या वर्षी बुधवार १९ नोव्हेंबर रोजी अपघाती निधन झाले. श्री. बागुल यांच्या दुःखात संस्था सहभागी आहे. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली !




### * सामुहिक व्रतबंधन *

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे व्रतबंधन सोहळा कार्यक्रम दि.०३/०५/२०२६ रोजी संस्थेच्या, श्री परशुराम भवन येथे आयोजित करण्यात येत आहे.
अधिक माहितीसाठी संस्था कार्यालय किंवा दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा.

**८३२९८९९८७८ / ०२५३–२५७६२४१ / ९८६०५१२२६७**



# धुंधुर्मास भोजन





***२०२६ चा धुंधुर्मास सहभोजनाचा कार्यक्रम या वर्षी संस्थेची नूतन वास्तू श्री परशुराम भवन येथे सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.***

***भोजन पास मूल्य प्रति व्यक्ती रु १००/- असून १५ डिसेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ पर्यंत (रविवार सोडून) संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील. जास्तीत जास्त सभासदांनी यात सहभागी व्हावे.***

**संस्थेची वेबसाईट :-**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## आयव्यय पत्रक (कालावधी १/४/२०२४ ते ३१/३/२०२५) करिता

| उत्पन्न | परि | रु | खर्च | परि | रू |
|---|---|---|---|---|---|
| | | | मालमत्तेसंबधी खर्च | | १,१६,७५३।०० |
| देणगी व वर्गणी | | - | | | |
| | | | व्यवस्थापकीय खर्च | | ९,८८,०३८।८० |
| कार्यालय उत्पन्न | | - | | | |
| | | | घसारा | | - |
| इतर जमा | | १,८१,८११।०० | | | |
| | | | उद्देशावर आलेला खर्च | | १०,६२,२४१।०० |
| व्याज जमा | | २०,११,८३७।०० | | | |
| | | | कार्यालय खर्च | | - |
| म्युच्युअल फंड नफा | | ५२०७८६।९८ | | | |
| | | | अधिक्य | | ५,४७,४०२।१८ |
| | | २७१४४३४।९८ | | | २७१४४३४।९८ |

अहवालास अनुसरून -

सनदी लेखापाल

| | अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|---|
| ( भालचंद्र द .कर्वे) | (श्री विजय साने) | (श्री हेरंब घारपुरे) | (श्री नितीन सहस्त्रबुद्धे) |

स्थळ :- नाशिक

दिनांक :-२५/०९/२०२५

**UDIN : 25105965BMGYWL5206**

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

**तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०२४ ते ३१/३/२०२५) करिता**

| जमा | परि क्र | रू | नांवे | परि क्र | रू |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | **२४,६३,४६९।८९** | मालमत्तेवरील खर्च | | १,१६,७५३।०० |
| देणगी व वर्गणी | | - | व्यवस्थापकीय खर्च | | ९,८८,०३८।८० |
| कार्यालय उत्पन्न | | - | कार्यालय खर्च | | - |
| व्याज जमा | | २०,११,८३७।०० | उद्देशावर आलेला खर्च | | १०,६२,२४१।०० |
| इतर जमा | | १,८१,८११।०० | | | |
| निधी | | १,६०,६०,१४६।०० | अनामत/ इतर खर्च | | ८०,६०,०५८।७४ |
| मालमत्ता/गुंतवणूक | | ३३०४४००३।०० | गुंतवणूक | | १,३४,७५,९३२।०० |
| म्युच्युअल फंड नफा | | ५२०७८६।९८ | | | |
| | | | मालमत्ता/ अग/ीम | | २४२६४४२९।२६ |
| | | | अखेर शिल्लक | | ६३,१४,६०१।०७ |
| | | ५४२८२०५३।८७ | | | ५४२८२०५३।८७ |

अहवालास अनुसरून -

सनदी लेखापाल

| | अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|---|
| ( भालचंद्र द .कर्वे) | (श्री विजय साने) | (श्री हेरंब घारपुरे) | (श्री नितीन सहस्त्रबुद्धे) |

स्थळ :- नाशिक

दिनांक :-२५/०९/२०२५

**UDIN : 25105965BMGYWL5206**

# चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## आढावा पत्रक (कालावधी १/४/२०२४ ते ३१/३/२०२५) करिता

| निधी व जोखीम | परि क्र | रू | रु | जिंदगी व येणे | परि क्र | रू | रु |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विश्वस्त निधी | | | | | | | |
| | | | १९६८२९७६।१५ | स्थावर मालमत्ता (मालमत्ता पत्रकाप्रमाणे) | | | ८,५१,५८,४२९।९१ |
| | | | | गुंतवणुक | | | २,०७,४७,१०२।०० |
| इतर देणे | | | ११,९४,५१३।५० | | | | |
| | | | | डिपॉझिट व ॲडव्हान्सेस | | | ७,६०,५१६।०० |
| | | | | इतर येणे | | | १२,५४,५९४।०० |
| | | | | अखेर शिल्लक | | | |
| | | | | रोख | | २,८२,७१८।७५ | |
| | | | | नामको बॅंक -००४९ | | ५८,१५,६२५।५८ | |
| | | | | परशुराम नागरी सहकारी पतसंस्या | | ६,१२३।०० | |
| उत्पन्न व खर्च यातील वाढ | | | | सारस्वत बॅंक - | | १७,५२१।३२ | |
| मागील बाकी | | ९,२८,१०,३५१।१५ | | नामको बॅंक- चित्तपावन | | २६,९७६।४० | |
| | | | | कॉसमॉस बॅंक | | ९४,९१०।५२ | |
| (-) चालु वर्षातील वाढ | | ५४७४०२।१८ | ९३३५७७५३।३३ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया -प्रशासकीय | | ७०,७२५।५० | ६३१४६०१।०७ |
| एकुण | | | ११४२३५२४२।९८ | एकुण | | | ११४२३५२४२।९८ |

अहवालास अनुसरून -

सनदी लेखापाल

| | अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|---|
| ( भालचंद्र द .कर्वे) | (श्री विजय साने) | (श्री हेरंब घारपुरे) | (श्री नितीन सहस्त्रबुद्धे) |

स्थळ :- नाशिक

दिनांक :-२५/०९/२०२५

**UDIN : 25105965BMGYWL5206**


...आम्ही फक्त सोनं विकत घेतो
संपर्क: पवित्र टकले
९८२२०५७०००
तुमच्या जुन्या सोन्याला सर्वोत्तम दर
टकले
ओल्ड गोल्ड
६०१, ६वा मजला, सिद्धी पूजा
बिजीनेस स्क्वेअर, लेले हॉस्पिटल
मागे, कुलकर्णी गार्डन जवळ,
शरणपुर रोड, नाशिक - ४२२००२

सस्नेह निमंत्रण

श्री घैसास गुरुजी वेदपाठशाळा,

वेदभवन वर्धापनदिनानिमित्त

# भागवत कथा ज्ञानसत्र

दि. ५ ते १२ जानेवारी २०२६ सायं. ५ वाजता



अनंतश्रीविभूषित पश्चिमाम्नाय द्वारकाशारदापीठाधीश्वर श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य

## प.प. सदानंद सरस्वती स्वामी महाराज

स्थान

कृष्णनगरी, महाराष्ट्र गंथोत्तेजक सभेचे दक्षिणाभवन, वेदभवनाशेजारी,
स.नं. ७७/१/२, पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११०३८



**मोरेश्वर विनायक घैसास**
प्रधानाचार्य, वेदभवन आणि संयोजक



**भागवताचार्य प.प. गोविंद देवगिरीजी स्वामी महाराज**
अध्यक्ष

माहितीसाठी संपर्क : ८८०६०४४८१०



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**


प्रति, ______________________

______________________

______________________


या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.



RNI - Regd No. 35688 / 20-11-1979

सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023

सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.